# भारतीय जनता पक्ष

(केंद्रिय कार्यालय)

11,अशोक रोड, नवी दिल्ली-110001

फोन नः 23005700, फॅक्सः 23005787

## लोकसभेच्या विरोधी पक्षनेत्या श्रीमती सुषमा स्वराज आणि राज्यसभेचे विरोधी पक्षनेते श्री अरुण जेटली यांचे संयुक्त निवेदन

सरकारने 27 डिसेंबर 2011 रोजी सादर केलेले लोकपाल बिलाला लोकसभेत मंजुरी मिळाली.लोकपालांची नेमणूक सरकार करणार आणि त्यांच्या कामगिरीवर सरकारचे नियंत्रण राहणार. लोकपालांच्या कामकाजात तपास एजन्सी प्रमाणे सीबीआय राहील, ज्यावर सुद्धा सरकारचे नियंत्रण असेल. अशा स्वरुपाचे बिल भाजपाला मान्य नाही. त्या बिलाबद्दल राज्यसभेत 29 डिसेंबर, 2011 रोजी चर्चा झाली होती. त्यावेळी विरोधी पक्षातर्फे त्यात सुधारणा करण्यास सूचना करण्याचे सांगण्यात आले होते. अनेक सदस्य त्या बीलात सुधारणा करण्याच्या बाजूने होते, परंतु 29 डिसेंबर,2011 रोजी राज्यसभा तहकुब करण्यात आली. त्यानंतर कॉग्रेसचे सदस्य श्री सत्यव्रत चतुर्वेदी यांच्या अध्यक्षतेखाली ते बील निवड समितीकडे सोपविण्यात आले. निवड समितीच्या अनेक बैठका झाल्या होत्या आणि 23 डिसेंबर,2012 रोजी आपला अहवाल सुपर्द केला तेव्हापासून तो अहवाल पेंडींग ठेवण्यात आला. तो अहवाल राज्यसभेचे कामकाज आणि प्रक्रियेचे नियम-91 खाली निवड समितीने सदनात सादर केला. आता त्यामध्ये किती सुधारणा करणार हे सदनाने नक्की करावयाचे आहे. स्थायी समितीत त्या अहवालात सरकारने सुधारणा करण्यास सूचविले होते, पण याप्रकरणी विपरित परिस्थिती झाली.

काही मुद्द्यांची उकेल काढण्याप्रकरणी भाजपाचे विचार निवड समितीच्या अभिप्रायापेक्षा एकदम वेगळे आहेत. भाजपाचे असे मत आहे की, अनेक मुद्द्यांवर निवड समितीने सर्वानुमते शिफारशी सूचविल्या आहेत. निवड समितीच्या शिफारशी बाबत सर्वसंमती साधण्यासाठी राज्यसभेला योग्य शिफारशी बाबत सर्वसंमती द्यायला पाहिजे.संसदेच्या दोन्ही सभागृहात अनेकदा या बीलावर चर्चा झाली आहे. भाजप मानतो की निवड समितीच्या शिफारशी राज्यसभेने मान्य केल्यानंतर त्या लोकसभेसमोर ठेवल्या पाहिजेत.

सध्या संसदेचे दोन्ही सभागृह, भारतातील लोकांचे जीवन यांच्या  विश्वसनीयतेचा प्रश्न असल्याने निवड समितीच्या शिफारशी सर्वांनी मान्य करणे गरजेचे आहे.

सभागातील बैठकीत समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्षाच्या नेत्यांनी वारंवार व्यत्यय आणला. त्या पक्षाने मागील साडेचार वर्षात सरकारचे अस्तित्व टिकविण्यासाठी मदत केली होती. त्या पक्षाने सदनाच्या कामकाजात (सरकारच्या बाजूने) व्यत्यय आणला, अशा परिस्थितीत आम्हाला असे सांगावेसे वाटते की लोकपाल बील अनेक दिवसांपासून थांबले असल्याने युपीए आणि एनडीए कडून संयुक्तपणे बील हे चर्चेशिवाय मंजुर केले पाहिजे आणि त्यानंतर निवड समितीच्या शिफारशींना सर्वसंमितीने मान्य करायला पाहिजेत. आता यानंतर जर का सरकारचे समर्थक पक्ष सभागृहाचे कामकाजात अडथळा आणतील तर त्याचा अर्थ असा होतो की सरकारला लोकपाल बील पुढे आणण्यास रस नाही. आम्ही या बाबींचा पुनरुच्चार करतो की आम्ही ते बील चर्चेशिवायच मंजुर करण्यास उत्सुक आहोत.

**(आर.के.सिन्हा)**

**मानद मंत्री, भाजप संसदीय पक्ष**